
सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
❏ वर्ष - ३ रे ❏ अंक - २४३ वा ❏ अमरावती (महाराष्ट्र) ❏ मंगळवार दि. २८ ऑक्टोंबर २०२५ ❏ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❏ मुल्य - १ रु. ❏ पृष्ठ -६

## आदित्य ठाकरेंनी महाराष्ट्राचा पप्पू आहे असे प्रदर्शन करू नये; मुख्यमंत्री फडणवीसांचा खोचक टोला

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८मुंबई**

आत्तापर्यंत सरकारने जाहीर केलेल्या मदतीच्या अंतर्गत ८ हजार कोटी रुपये वितरीत करण्यात आले आहेत. जवळपास ४० लाख शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये पैसे पोहचले आहेत. मंत्रिमंडळाच्या बैठकीत अजून ११ हजार कोटी रुपये वितरीत करण्याला मान्यता देण्यात आली. हे बजेटमधील पैसे नसल्याने याला विशेष बाब म्हणून मान्यता देण्यात आली. हेही पैसे पुढच्या १५ दिवसांत शेतकऱ्यांच्या खात्यात पोहचवण्याचे आदेश आम्ही दिले आहेत, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.



राज्यामध्ये अतिवृष्टी आणि महापूरामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड मोठे नुकसान झाले होते. त्यानंतर राज्य सरकारकडून शेतकऱ्यांसाठी मदतीचे पॅकेज जारी करण्यात आले. मंत्रिमंडळाच्या बैठकीत या मदतीचा आढावा घेण्यात आला. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकारांना सविस्तर माहिती दिली. निधीची कुठलीही कमतरता उरलेली नाही. आता दिला गेलेला निधी वेगवेगळ्या जिल्ह्यांमध्ये वेगवेगळ्या पद्धतीने गेला आहे. काही ठिकाणी तो अंशतः गेला आहे. याचे कारण म्हणजे आम्ही एक निर्णय घेतला होता, की जशा याद्या येतील तशी मान्यता द्यायची, सर्व याद्यांसाठी थांबायचे नाही, असेही फडणवीस यांनी सांगितले.

आदित्य ठाकरे यांनी मतदारयाद्यांमधील घोळाची माहिती समोर आणली आहे. याबाबत देवेंद्र फडणवीस यांना प्रतिक्रिया विचारण्यात आली. यावर बोलताना, आदित्य ठाकरेंनी मी महाराष्ट्राचा पप्पू आहे असे प्रदर्शन करू नये. मी त्यांना महाराष्ट्र पप्पू म्हणणार नाही. राहुल गांधी जशी मोठी स्क्रीन लावतात. येरझाऱ्या घालतात. पण खोदा पहाड, चुहा भी नही निकला, असे असते. आदित्य ठाकरेंनी हेच केले. त्यांची उत्तर निवडणूक आयोगाने दिलेली आहेत. आदित्य ठाकरेंकडून माझी एवढीच अपेक्षा आहे की, त्यांनी राहुल गांधी बनू नये, असा टोला देवेंद्र फडणवीस यांनी लगावला.

दरम्यान, कोणी शंका बाळगण्याची गरज नाही की, आम्हाला तर एनडीआरएफचे पैसे मिळाले पण १० हजार मिळाले नाहीत. १० हजार मिळाले पण तीन हेक्टरचे मिळाले नाहीत. ज्यांना दोन हेक्टरचे पैसे मिळाले आता त्यांच्या खात्यात तिसऱ्या हेक्टरचे पैसेही टाकतोय.

## उत्तर प्रदेशमधील आणखी एका शहराचे नाव बदलले

### मुस्तफाबादचं 'कबीरधाम' झाले, योगींची घोषणा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८लखीमपूर**

उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी रविवारी लखीमपूर खीरी येथील दौऱ्यादरम्यान, एक मोठी घोषणा केली आहे. फैजाबादचं अयोध्या आणि इलाहाबादचं प्रयागराज असं नामकरण केल्यानंतर आता योगींनी मुस्तफाबाद शहराचं नामकरण कबीरधाम असं करण्यात येत असल्याचं जाहीर केलं आहे. आधीच्या सरकारांच्या काळात प्रयागराजचं इलाहाबाद, अयोध्येचं फैजाबाद आणि कबीरधामचं मुस्तफाबाद असं नाव बदलण्यात आलं होतं. आता आम्ही या शहरांची ओळख त्यांना परत मिळवून देण्याचं काम केलं आहे. विरोधी पक्ष सेक्युलॅरिझमच्या नावाखाली या गोष्टी करायचे मात्र. सेक्युलॅरिझम हे एक थोतांड आहे, असा टोलाही योगी आदित्यनाथ यांनी लगावला.



यावेळी योगी आदित्यनाथ म्हणाले की, संत कबीरदास यांची वाणी आजही समाजाला मार्गदर्शन करत आहे. त्यांनी निर्गुण भक्तीची अशी पावन धारा प्रवाहित केली जी समाजातील भेदभावाला दूर करून आत्मा आणि परमात्म्याचा संबंध सोप्या शब्दांमध्ये सर्वसामान्यांना समजावण्यात यशस्वी ठरली आहे.

योगी आदित्यनाथ पुढे म्हणाले की, गुरू गोविंद दोनो खडे काके लागूं पांव... हा दोहा आजही आम्हाला गुरूच्या महत्त्वाची आठवण करून देतो. शेकडो वर्षे लोटली तरी संतवाणी ही आजही तितकीच प्रासंगिक आहे. कबीर यांनी त्या काळी समाजातीय जातीय विषमतेवर प्रहार केला होता. 'जाति पाती पुछे न कोई, हरि को भजो सो हरि काई होई', ही वाणी आपल्या समाजातील एकता आणि अखंडतेचा आधारस्तंभ आहे, असेही योगी म्हणाले.

यावेळी देशाची एकता तोडणाऱ्या शक्तींपासून सावध राहण्याची आवश्यकता असल्याचेही योगी आदित्यनाथ यांनी सांगितले. ते म्हणाले की, आजही समाजविरोधी शक्तींपासून सावध करण्याची आवश्यकता आहे. आजही समाजविरोधी शक्ती श्रद्धास्थानांवर प्रकार करण्याचा आणि जातीच्या नावाखाली फूट पाडण्याचा प्रयत्न करत आहेत. जर आपण वेळीच आपल्यातील उणिवा ओळखल्या नाहीत, तर हे आजार कॅन्सरप्रमाणे समाजाला खिळखिळे करतील. अशा परिस्थितीत देशभक्ती हीच सर्व समस्यांवरील उपाय आहे. ही भूमी हा केवळ एक जमीनीचा तुकडा नाही, तर ही आमची मातृभूमी आणि पितृभूमी आहे. या भूमीची सेवा हीच खरी उपासना आहे, असेही योगी आदित्यनाथ यांनी सांगितले.

## राष्ट्रवादी कार्यालयात लावणी अन् पदाधिकाऱ्यांना फटाके

### सुनील तटकरेंची नागपूर शहराध्यक्षांना नोटीस

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८नागपूर**

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या नागपुरातील गणेशपेठ येथील कार्यालयात आयोजित दिवाळी मिलन कार्यक्रमात कलाकार असलेल्या एका कार्यकर्तीने लावणी सादर केली. पक्ष कार्यालयातील लावणीचा व्हिडीओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल झाला. चौफेर टीकेची झोड उठली. याची प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी गंभीर दखल घेतली. नागपूर शहराध्यक्ष अनिल अहीरकर यांना नोटीस जारी करीत याप्रकरणी सात दिवसांच्या आत खुलासा सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.



> मी लावणी आर्टिस्ट आहे. सगळीकडे लावणी सादर करते. मी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाशी जुळली आहे. पक्षाच्या दिवाळी मिलन कार्यक्रमात ज्या महिलांना गाणे म्हणता येत होते त्यांनी गाणे गायिले. काही पुरुषांनी डान्स केला. पक्षातील काही महिला पदाधिकाऱ्यांनी मला विनंती केली असता मी लावणी सादर केली. हा पक्षांतर्गत सोहळा होता. यात चुकीचे काहीच घडले नाही.
>
> **शिल्पा शाहीद, लावणी कलाकार**

हा व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला. एकीकडे शेतकऱ्यांची दिवाळी काळी झाली आणि दुसरीकडे अजितदादांच्या पक्षाच्या कार्यालयात बघा कसे ठुमके घेतले जात आहेत, अशी टीका सोशल मीडियावर उमटली.

## सरकारी कर्मचाऱ्यांसाठी खुशखबर!

### ८ व्या वेतन आयोगाला केंद्राची मंजुरी वाढीव पगार कधीपासून मिळणार?




**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८ नवी दिल्ली**

आज झालेल्या बैठकीत केंद्रीय मंत्रिमंडळाने आठव्या वेतन आयोगाच्या कार्यक्षेत्राच्या अटींना हिरवा कंदील दाखवला. तसेच, आयोगाला आपला अहवाल सादर करण्यासाठी १८ महिन्यांचा कालावधी देण्यात आला आहे.

नव्या वेतन आयोगाच्या अध्यक्षपदी माजी न्यायमूर्ती रंजना प्रकाश देसाई असतील, तर सदस्य म्हणून आयआयएम बंगळुरूचे प्रा. पुलक घोष आणि पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालयाचे सचिव पंकज जैन यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

आठवा वेतन आयोग खालील प्रमुख मुद्द्यांवर शिफारशी करणार आहे:-

देशाची आर्थिक परिस्थिती आणि वित्तीय शिस्त राखण्याची गरज.विकास आणि कल्याणकारी योजनांसाठी आवश्यक संसाधनांची उपलब्धता.

नॉन-कॉन्ट्रिब्युटरी पेन्शन स्कीम्सचा आर्थिक भार आणि टिकाऊपणा. आयोगाच्या शिफारशींचा राज्य सरकारांच्या वित्तीय स्थितीवर परिणाम. केंद्रीय सार्वजनिक क्षेत्र उपक्रम (PSUs) आणि खाजगी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांच्या वेतन रचनेचा तुलनात्मक अभ्यास.

दर १० वर्षांनी होतो वेतन आयोगाचा आढावाकेंद्र सरकारकडून दर दहा वर्षांनी वेतन आयोग स्थापन केला जातो, ज्यामध्ये सरकारी कर्मचाऱ्यांचे वेतन, निवृत्तीवेतन आणि इतर सेवा अटींचा पुनर्विचार केला जातो. २०१६ साली लागू झालेला सातवा वेतन आयोग १ जानेवारी २०१६ पासून प्रभावी झाला होता. त्याच पद्धतीने, आठव्या वेतन आयोगाच्या शिफारशी १ जानेवारी २०२६ पासून लागू होईल.

## उदखेड येथे शेतकरी पुत्राला ३३ केव्ही विजेचा धक्का

### महावितरणच्या भोंगळ कारभारावर शेतकऱ्यांचा संताप

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८मोर्शी**

उदखेड (ता. मोर्शी) येथे शेतातील वीजपुरवठा खंडित झाल्याने स्वतः दुरुस्ती करण्यासाठी गेलेल्या शेतकरी पुत्राला ३३ केव्ही लाईनचा जबर विजेचा धक्का बसल्याची घटना घडली. सुदैवाने मोठी हानी टळली असून या प्रकारामुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे.



गेल्या अनेक दिवसांपासून अंबाडा-डोमक फिटरवरील विजेच्या पोलवर झाडे, झुडपे आणि वेल वाढल्याने वारंवार वीजपुरवठा खंडित होत आहे. याबाबत शेतकऱ्यांनी वारंवार महावितरण अधिकाऱ्यांना कळविले, मात्र कोणतीही दुरुस्ती करण्यात आलेली नाही. अधिकारी फोनवर संपर्क साधण्यासही टाळाटाळ करीत असल्याचा शेतकऱ्यांचा आरोप आहे.

वीजपुरवठा खंडित झाल्याने उदखेड येथील अक्षय राजेंद्र पोहकार हा स्वतः लाईन दुरुस्ती करण्यासाठी गेला असता, त्याला ३३ केव्ही वीजेचा जबर धक्का बसला. काही वेळ तो शेतात बेशुद्ध अवस्थेत पडून होता. नंतर शेतकऱ्यांनी तत्काळ त्याला मोर्शी येथील खाजगी रुग्णालयात दाखल केले असून सध्या त्याची प्रकृती स्थिर असल्याचे समजते.

या घटनेनंतर संतप्त शेतकऱ्यांनी महावितरण कार्यालयावर धडक देत अधिकाऱ्यांना जाब विचारला. उपस्थित अधिकाऱ्यांनी पुढील आठ दिवसांत सर्व दुरुस्ती करून अशा घटना पुन्हा घडू नयेत याची हमी दिली.शेतकऱ्यांच्या मते, महावितरण कंपनीचा भोंगळ कारभार आणि दुर्लक्षामुळे शेतकऱ्यांचे जीव धोक्यात आले आहेत. प्रशासनाने यावर तातडीने लक्ष देऊन जबाबदारांवर कारवाई करण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

## बच्चू कडूंचा ट्रॅक्टर मोर्चा, नागपुरातील मुख्यमंत्री निवासस्थानी सुरक्षा वाढवली

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८नागपूर**

शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते तथा माजी मंत्री बच्चू कडू यांनी आंदोलन सुरू केले आहे. शेतकऱ्यांच्या मागण्या तात्काळ मान्य न झाल्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नागपूर येथील शासकीय निवासस्थान 'रामगिरी'वर ट्रॅक्टर मोर्चा घेऊन जाण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.



बच्चू कडू यांच्या या इशाऱ्यानंतर प्रशासन सतर्क झाले असून रामगिरी परिसरात पोलीस बंदोबस्त वाढवण्यात आला आहे. परिसरात अतिरिक्त पोलीस तैनात करून कडेकोट सुरक्षा व्यवस्था उभारण्यात आली आहे. दरम्यान, शेतकऱ्यांना हमीभाव, वीजबिल माफी, पीकविमा आणि नुकसान भरपाई यांसारख्या प्रमुख मागण्यांबाबत शासनाने तत्काळ निर्णय घ्यावा, अशी मागणी कडू यांनी केली आहे.

## शिक्षक मतदार नोंदणीसाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत ६ नोव्हेंबरपर्यंत

### मतदार नोंदणीसाठी अर्जाची ऑनलाईन सुविधा उपलब्ध

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८अमरावती**

भारत निवडणूक आयोगाने दि. १ नोव्हेंबर २०२५ या अर्हता दिनांकावर आधारित अमरावती विभागातील शिक्षक मतदार मतदारसंघात नव्याने मतदार याद्या तयार करण्याचा कार्यक्रम घोषित केला आहे. मतदार यादी कार्यक्रमानुसार नमुना क्रमांक १९ व्दारे अर्ज स्वीकारण्याचा अंतिम दिनांक ६ नोव्हेंबर, २०२५ असा आहे. त्याचप्रमाणे शिक्षक मतदार संघासाठी नमूना क्रमांक-१९ मधील अर्ज भरण्याची सुविधा आता ऑनलाईन उपलब्ध असून त्यासाठी https://mahaelection.gov.in/Citizen/Login या संकेतस्थळावर लॉगीन करून पात्र शिक्षकांना आवश्यक त्या पुरावा कागदपत्रांसह दिनांक ६ नोव्हेंबर, २०२५ रोजी पर्यंत ऑनलाईन अर्ज सादर करता येईल. त्याप्रमाणे शिक्षक मतदार संघासाठी विहित नमूना क्रमांक-१९ मधील अर्ज आवश्यक पुराव्यांसह संबंधित सहायक मतदार नोंदणी अधिकारी, पदनिर्देशित अधिकारी यांच्याकडे ऑफलाईन दाखल करण्याची कार्यपध्दतीही मतदार नोंदणी कार्यक्रमाच्या वेळापत्रकानुसार दिनांक ६ नोव्हेंबर, २०२५ रोजी पर्यंत सुरु आहे.

## 'मी जिवंत आहे; माझ्या निधनाची बातमी' माजी मंत्री वसुधाताई देशमुख यांचा खुलासा!

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८ अमरावती**

अमरावती : प्रसिद्धी माध्यमे आणि समाज माध्यमांमध्ये चुकीची बातमी प्रसारीत झाली, तर किती गोंधळ उडतो, याचा प्रत्यक्ष अनुभव माजी राज्यमंत्री वसुधाताई देशमुख यांना आज सकाळीच आला. त्यांच्या निधनाची चुकीची बातमी एका स्थानिक वृत्तपत्राने प्रकाशित केल्यानंतर एकच खळबळ उडाली. यामुळे वसुधाताई देशमुख यांनाही मोठा धक्का बसला. अनेक हितचिंतकांनी त्यांच्या निवासस्थानी धाव घेतली.

वसुधाताई देशमुख यांनी एक व्हिडीओ समाज माध्यमांवर प्रसारीत केला आहे. त्यात त्यांनी आपण सकुशल असल्याचे म्हटले आहे. माझ्या निधनाची बातमी कुणी दिली, हे मला माहित नाही, पण वृत्तपत्रात चुकीची बातमी आली की, अनेकांची मने दुखावली जातात. हितचिंतक अस्वस्थ होतात. कुठल्याही बातमीची शहानिशा करायला हवी. शहानिशा केल्याशिवाय अशा प्रकारच्या संवेदनशील बातम्या प्रसारीत करणे गैर आहे, अशा शब्दात वसुधाताई देशमुख यांनी नाराजी देखील व्यक्त केली आहे. या चुकीच्या बातमीमुळे वसुधाताई यांच्या निकटवर्तीयांना चांगलाच मनस्ताप सहन करावा लागला. स्वत: वसुधाताई यांना समाज माध्यमांवर व्हिडिओ प्रसारीत करून आपण सकुशल असल्याचे सांगावे लागले.

आज पहाटेच समाज माध्यमांवर वसुधाताई देशमुख यांच्या निधनाची बातमी प्रसारीत झाली. त्यांच्या हितचिंतकांसाठी हा फार मोठा धक्का होता. अनेकांनी वसुधाताई यांच्या येथील कॅम्प परिसरातील



निवासस्थानी धाव घेतली. त्या सकुशल असल्याचे कळल्यानंतर हितचिंतकांनी, समर्थकांनी सुटकेचा नि:श्वास टाकला.

समाज माध्यमांवर अनेकांनी श्रद्धांजलीचे संदेश धाडले. नंतर त्यांनाच त्याचे खंडन करावे लागले. वसुधाताई देशमुख यांना दीर्घायुष्य लाभो, अशी प्रार्थना या लोकांनी नंतर केली. मात्र, संपूर्ण जिल्ह्यात या चुकीच्या बातमीने चांगलीच खळबळ उडवून दिली होती.

वसुधाताई देशमुख यांच्या निधनाची बातमी काही प्रसार माध्यमांनी देखील कुठलीही शहानिशा न करता प्रसारीत केल्याने त्यांच्या हितचिंतकांनी नाराजी व्यक्त केली आहे. समाज माध्यमांवर अनेकांना खुलासा करावा लागला. खुद्द माजी पालकमंत्री आणि काँग्रेसचे नेते डॉ. सुनील देशमुख यांनी निधनाचे वृत्त चुकीचे असल्याचे समाज माध्यमांवर स्पष्ट केले.

वसुधाताई देशमुख या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (शरद पवार) प्रदेश उपाध्यक्षा आहेत. यांनी दीर्घकाळ अचलपूर मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केले आहे. महाराष्ट्राच्या राज्यमंत्री म्हणून त्यांनी कार्य केले आहे. त्या श्रमसाफल्य फाऊंडेशनच्या अध्यक्षा आहेत आणि कृषी विज्ञान केंद्रासारख्या संस्थांच्या माध्यमातून कृषी तंत्रज्ञान विकासावर काम करीत आहेत.

राज्यातील शेतकऱ्यांच्या समस्या तीव्र होत असताना कडू यांच्या या आंदोलनाच्या इशाऱ्यामुळे राजकीय वर्तुळात हालचाली वाढल्या आहेत. शासनाकडून यावर कोणती भूमिका घेतली जाणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. आंदोलक वर्धा येथून बुटीबोरीकडे निघाले आहेत. रॅलीत हजारो ट्रॅक्टर, बैलगाड्या आणि मेंढपाळ बांधवांचा सहभाग आहे. आंदोलनासाठी अन्नसामुग्रीची मोठ्या प्रमाणात तयारी करण्यात आली आहे. सोलापूरहून २० हजार भाकऱ्या, मिरची आणि शेंगदाण्याचा खरडा, नाशिकहून कांदा व भाजीपाला, लातूरहून तूरडाळ, तसेच इतर भागांतून हुरडा व अन्नधान्य नागपूरकडे रवाना झाले आहे.

दरम्यान आंदोलन दुपारी ४ वाजेपर्यंत नागपूर सीमेवर मंत्री यांची प्रतीक्षा करणार आहेत. राज्य शासनाकडून योग्य प्रतिसाद न मिळाल्यास हा ट्रॅक्टर मोर्चा मुख्यमंत्र्याचे शासकीय निवासस्थान रामगिरीकडे कुच करणार आहे, अशी माहिती आंदोलकांनी दिली आहे.

## संपादकीय ......

# निवडणूक पटावरील डाव

स्थानिक स्वराज्य संस्थांसाठीच्या जागावाटपाच्या रणनीतीला सुरुवात झाली आहे. सत्ताधारी महायुतीतील घटकपक्षाचे नेते ताकद असेल तिथे स्वतंत्र लढून नंतर एकत्र येण्याची आखणी करत आहेत. विरोधक सध्या मतदारयादीविरोधी मोर्चाची तयारी करत आहेत.

भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वातील सत्ताधारी युती मतदारांना प्रलोभने दाखवते आणि निवडणुका जिंकते, त्यामुळे आता खरे तर निवडणुका लढण्यातच अर्थ नाही, असे हताश उद्गार विरोधी पक्ष काढू लागले आहेत. मतदारयादी सदोष, त्यातच कुठे १५०० रुपये महिन्याची तर कुठे १०००० रु. वर्षाची ओवाळणी! सगळी व्यवस्थाच सत्ताधार्यांची बटीक. लढले तरी पराभव निश्चित! असे बडे राजकीय नेते खासगीत सांगतात. विरोधी पक्षांचा विश्वास असा डळमळीत झाला की युतीने सत्तेत असलेल्या एकमेकांना प्रतिस्पर्धी मानत स्वबलावर जागा लढून त्या जिंकत विस्तारण्याची स्पर्धा सुरू होते. सध्या महाराष्ट्रात तसेच काहीसे घडते आहे. खरे तर लोकभेतील यशानंतर विरोधी बाकांवर इतकी हताशा का हा खरे तर प्रश्न. अभ्यास केला नाही, पेपर सोडवायला आत्मविश्वास येणार कसा, असे टोमणे सत्ताधारी मारताहेत! असो. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या वारसाला उद्धव ठाकरे यांना छोटे ठरवत भाजपच्या वळचणीला येऊन बसलेल्या एकनाथ शिंदे यांना त्यांच्या राजकीय बंडाची किंमत हवी आहे. खरे तर मुख्यमंत्री करून त्यांच्या या साहसाचा सन्मान भाजपने केला होता. तो उचित होता, असे राज्यातील भाजप नेत्यांना वाटते.

विधानसभा निवडणुकांमध्ये भाजपने प्रचंड मुसंडी मारली. एकनाथ शिंदे हे मित्र असले तरी ते कुठल्या रांगेतले मनसबदार आहेत, असा प्रश्न आता त्यांना स्वतःला आणि भाजपच्या नेत्यांनाही पडत असावा. मला राजासारखे वागवा, मी उद्धव ठाकरे यांच्यापेक्षाही लोकप्रिय नेता असल्याचे सांगण्यासाठी एकनाथ शिंदे दिल्लीत गेले असावेत. आजही भारतीयांच्या मनोराज्यावर गारुड करणार्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांना प्रदीर्घ वेळ दिला हेच शिंदे यांचे महत्त्व आहे. बिहारच्या निवडणुकांचे निकाल वेगळे लागले तर भारतीय जनता पक्षाला मित्रपक्षांची गरज अधिकच भासेल. शिंदे यांना भाजपसारख्या मजबूत संघटनात्मक बांधणी असलेल्या ज्येष्ठ सहकारी मित्रासमोर स्वतःचे अस्तित्व टिकवून ठेवायचे आहे. ते करताना जिथे स्वतःची शक्ती आहे तिथे योग्य तो वाटाही मिळवयायचा आहे. शेवटी राजकारणात स्वतःची किंमत स्वतःच ठरवायची असते आणि ती वसूलही करून घ्यायची असते. या नियमाचे अचूक पालन शिंदे करतील, असे दिसते. त्यामुळेच ठाणे या त्यांच्या गडात युती होईल की नाही याबाबत प्रश्नचिन्ह आहे. लगतच्याच कल्याण - डोंबिवलीमध्ये भाजप आणि शिंदे सेनेने आपणच दोघे ताकदवान पक्ष असल्याचे लक्षात घेत वेगवेगळे लढायचे ठरवले आहे. नवी मुंबईमध्ये ठाण्यासारखेच युद्ध आहे. तिथे भाजपकडे गणेश नाईक यांच्यासारखा एकनाथ शिंदे यांना आव्हान देणारा नेता आहे. नाईक आणि शिंदे हे दोघे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या काळातही परस्परांसमोर प्रतिस्पर्धी म्हणूनच वावरत असत.

आता ही लढाई अधिकच तीव्र होणार आहे. मुंबई जिंकण्यासाठी भाऊबंदकी आता भावबंधनात बदलली आहे. ठाकरे ब्रँड एकत्र येऊन लढेल असे दिसते. भाजपदेखील हे बहुभाषिक महानगर आता सेनेचे नाही तर संपूर्ण देशातील सत्ता केंद्र असलेल्या भाजपच्या मोदींचे झाले आहे हे दाखवण्यासाठी धडपडणार आहे. त्यासाठी त्यांना खरा शिवसेना ब्रँड आमच्यासमवेत आहे हे दाखवावे लागेल. शिंदे यांची ताकद लक्षात घेऊन जागा देणे हे आव्हान आहे. उद्धव ठाकरे यांना सोडून शिंदे यांच्या आश्रयाला आलेले मुंबईतले बहुतांश माजी नगरसेवक हे भाजपच्या उमेदवारांना पराभूत करून जिंकले होते. त्यामुळे मुंबईतील जागा वाटप सोपे नाही. आगामी काही दिवसांत आचारसंहिता लागू होताच जागा वाटपाच्या चर्चा रंगू लागतील. स्थानिक नेत्यांच्या परस्पर आरोपांमुळे त्या टोकालाही जातील. यातच जनतेशी संबंधित काही प्रश्नांची चर्चा होण्याची अंधुक शक्यता आहे!

स्पर्धात्मकतेमध्ये काही 'जनप्रश्न' चर्चेला येतात आणि समस्यांची उत्तरे शोधली जातात. पुण्यातील जैन बोर्डिंगच्या वादग्रस्त जागेबद्दलही असेच झाले. काँग्रेस सोडून शिवसेना शिंदे गटाच्या आश्रयाला आलेल्या रवींद्र धंगेकर यांनी पदार्पणातच राष्ट्रीय स्तरावर केंद्रीय मंत्रिपद मिळवलेल्या मुरलीधर मोहोळ यांना स्वतःच्या ताकदीची चुणूक दाखवली. मोहोळ यांनी हा हल्ला अचूक हाताळला. युतीत बेकी निर्माण होऊ नये यासाठी पुणे येथे या प्रकरणात केलेले प्रयत्न हेच साधारण निवडणुकीचे स्वरूप असेल. आरोप होतील, पण ते आरोप तुटेस्तोवर ताणले जाणार नाहीत. विरोधी पक्षाला कोणताही फायदा होऊ नये यासाठी युतीतले सहकारी परस्परांविरोधात निवडणुका लढवतील, नंतर एकत्र येतील. पिंपरी-चिंचवड येथे भाजप आणि अजित पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष यांच्या जागावाटपात ज्यांना संधी मिळणार नाही ते शरद पवार यांच्या आश्रयाला जातील. केवळ नाराजीमुळे शरद पवारांना ४० ते ५० नगरसेवक लाभू शकतात, हे लक्षात घेत युतीचे नेते डाव टाकत आहेत- आधी दूर जायचे अन् नंतर एकत्र यायचे.राजकीय पक्षांना कायमच निवडणुकीचे वेध लागले असतात. प्रत्येक युतीचा खरा धर्म सत्ता मिळवणे हाच असतो. तुझी माझी धाव आहे सत्तेपासून सत्तेकडे, एवढेच सत्य असते. पावसाळ्याचे दिवस आले की, 'बरसाती मेंडक' जसे स्वतःची ताकद दाखवतात तसेच राजकीय पक्ष आपापल्या शक्तीची जाणीव करून देत जागांची वाटणी सुरू करतात. एखाद्या राज्याच्या सत्तेत तीन भागीदार असतील तर अर्थातच या जागा वाटपाच्या चर्चांना वेगळेच आयाम लाभतात.

# सोयाबीन, मूग, उडीद आणि तुरीच्या खरेदीला केंद्र सरकारची मंजुरी; शेतकऱ्यांना थेट लाभ



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८ अमरावती-** केंद्र सरकारने खरीप हंगाम २०२५-२६ मध्ये शेतकऱ्यांसाठी मोठी दिलासादायक घोषणा केली आहे.

केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण, तसेच ग्रामीण विकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी तेलंगणा, ओडिशा, महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश या चार राज्यांमध्ये डाळी आणि तेलबियांच्या खरेदी योजनांना १५,०९५.८३ कोटी रुपयांच्या विक्रमी खर्चासह मंजुरी दिली आहे.

या निर्णयामुळे संबंधित राज्यांतील लाखो शेतकऱ्यांचे उत्पन्न सुरक्षित होणार असून, त्यांना त्यांच्या पिकाला योग्य किमान आधारभूत मूल्य मिळण्यास मदत होईल.

श्री. चौहान यांनी या राज्यांच्या कृषिमंत्र्यांसोबत व्हर्च्युअल बैठक घेऊन 'प्रधानमंत्री अन्नदाता आय संरक्षण अभियान' अंतर्गत या योजनांना अंतिम रूप दिले.

या योजनेत महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी मूल्य समर्थन योजने (झडड) अंतर्गत करण्यात येणारी खरेदी विक्रमी स्तरावर आहे. महाराष्ट्रात १८,५०,७०० मेट्रिक टन सोयाबीन, ३,२५,६८० मेट्रिक टन उडीद आणि ३३,००० मेट्रिक टन मूग आदींची खरेदी मंजूर करण्यात आली आहे.

या खरेदीसाठी अंदाजित खर्च अनुक्रमे ९,८६०.५३ कोटी, २,५४०.३० कोटी आणि २८९.३४ कोटी इतका असेल. ही महाराष्ट्रासाठी मंजूर झालेली सर्वात मोठी झडड खरेदी योजना आहे.

याचप्रमाणे, ओडिशासाठी तूर उत्पादनाची १००% खरेदी मंजूर करण्यात आली आहे. तेलंगणामध्ये उडीद उत्पादनाची १००% खरेदी तसेच सोयाबीन व मूग (उत्पादनाच्या २५%) खरेदीला मंजुरी मिळाली आहे.तर मध्यप्रदेशात २२,२१,६३२ मे. टन सोयाबीनसाठी मूल्य तफावत भरपाई योजने अंतर्गत १,७७५.५३ कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

यावेळी बोलताना श्री. चौहान यांनी स्पष्ट केले की, शेतकऱ्यांचे उत्पन्न सुरक्षित ठेवणे आणि त्यांना बाजारातील अनिश्चिततेपासून सुरक्षा देणे ही मोदी सरकारची सर्वोच्च प्राथमिकता आहे.त्यांनी घोषणा केली की, सरकारने आता तूर, उडीद आणि मसूरची खरेदी राज्य उत्पादनाच्या १००% पर्यंत 'नाफेड' आणि 'एनसीसीएफ' या संस्थांमार्फत करण्याची व्यवस्था केली आहे, ज्यामुळे देश डाळी उत्पादनात आत्मनिर्भर होईल.

उत्पादित मालाच्या खरेदीचा थेट आणि त्वरित लाभ शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाला पाहिजे, यावर त्यांनी विशेष भर दिला आणि या संपूर्ण खरेदी प्रक्रियेवर कडक देखरेख ठेवण्याचे निर्देश सर्व संबंधित विभागांना दिले आहेत.

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष




## हळदीचे पाणी की हळदीचे दूध; आरोग्यासाठी काय फायदेशीर? फरक जाणून व्हाल थक्क !

दि.२८ विदर्भ प्रजासत्ताक २


हळद हा स्वयंपाकघरातील महत्त्वाचा घटक आहे. हळदीत अनेक औषधी गुणधर्म असतात. हळदीमध्ये अँटीऑक्सिडेंट आणि अँटी-इंफ्लेमेटरी (दाहक-विरोधी) गुणधर्म आहेत, ज्यामुळे रोगप्रतिकारशक्ती वाढते, अनेक प्रकारच्या संसर्गापासून शरीराचे संरक्षण होते. शिवाय यामुळे पचनक्रिया सुधारते, रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित राहते आणि त्वचेसाठीही हळदीचा फायदा होतो. त्यामुळे अनेक जण वजन कमी करण्यासाठी सकाळी हळदीचे पाणी घेतात. तर काहींना रात्री झोपण्यापूर्वी हळदीचे दूध घेण्याची सवय असते. पण या दोन्हीपैकी आरोग्यासाठी जास्त फायदेशीर काय आहे? हे तुम्हाला माहित आहे का? यामधील फरक जाणून घेणे गरजेचे आहे.

**हळदीचे पाणी**

कोमट पाण्यात एक चमचा हळद घालून हे पाणी पिल्यास फायदेशीर ठरते. यामुळे दिवसभर शरीर हायड्रेट राहते. तसेच यकृताच्या आरोग्यासाठीही हे पाणी उपयुक्त ठरते. शरीरातील विषारी पदार्थ काढून टाकण्यास हे पाणी मदत करते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे वजन कमी करण्यासाठी किंवा नियंत्रणात ठेवण्यासाठी हे पाणी पिणे सर्वोत्तम ठरते. सकाळी रिकाम्या पोटी एक ग्लास हळदीचे पाणी पिणे फायदेशीर ठरते. मात्र जास्त प्रमाणात हे पाणी पिल्यास जळजळ, पित्ताचा त्रास होऊ शकतो.

**हळदीचे दूध**

हळदीचे दूध हे बहुतेक लोकं रात्री झोपण्यापूर्वी घेणे पसंत करतात. दूध गरम करून त्यात एक चमचा हळद घालून हे बनवले जाते. हळदीच्या दुधामुळे



रोगप्रतिकारक शक्ती वाढते. सर्दी, खोकलासारख्या आजारांवर हे दूध प्रभावी ठरते. या दुधामुळे झोपेची गुणवत्ता सुधारते. हे प्रथिने, कॅल्शियम आणि आवश्यक पोषक तत्वांनी समृद्ध असते. हळदीच्या दुधात हळदीच्या पाण्यापेक्षा जास्त कॅलरीज असतात. रात्री झोपण्यापूर्वी हळदीचे दूध पिणे सर्वात फायदेशीर ठरते.

**आरोग्यासाठी काय फायदेशीर?**

हळदीचे पाणी हे शरीराला डिटॉक्सीफाय करते, यामुळे दिवसभर ताजेतवाने वाटते. वजन कमी करण्यासाठी हे अत्यंत फायदेशीर आहे. तर हळदीचे दूध हे संसर्गापासून शरीराचे संरक्षण करते. यामध्ये हळदीच्या पाण्यापेक्षा जास्त प्रमाणात कॅलरीज असल्याने हे वजन कमी करण्यासाठी घेऊ नये. जर तुम्हाला वजन नियंत्रणात ठेवायचे असेल तर हळदीच्या दुधापेक्षा सकाळी एक ग्लास हळदीचे पाणी पिणे योग्य ठरते.

# मोंथा वादळ झालं तीव्र, आंध्र प्रदेशात हाय अलर्ट; महाराष्ट्रावरही करणार परिणाम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८मुंबई-** बंगालच्या उपसागरात तयार झालेल्या मोंथा चक्रीवादळानं तीव्र रूप धारण केलं आहे. हे वादळ आज संध्याकाळपर्यंत आंध्र प्रदेशच्या किनारी भागात पोहचणार आहे. यामुळं आंध्र प्रदेशसह अनेक राज्यांना देखील अती दक्षतेचा इशारा देण्यात आला आहे. या वादळाचा परिणाम हा फक्त आंध्र प्रदेश पुरता मर्यादित राहणार नाही तर त्याचा परिणाम हा महाराष्ट्र, तमिळनाडू, पश्चिम बंगाल, छत्तीसगड आणि मध्य प्रदेशातील काही भागातही जाणवणार आहे.

भारतीय हवामान खात्याचे उच्च अधिकारी जीएनआरएस श्रीनिवास राव यांनी सांगितलं की, 'मोंथा चक्रीवादळ मंगळवारी सायंकाळपर्यंत आंध्र प्रदेशच्या किनारी भागात धडकण्याचा अंदाज आहे. याचा प्रभाव हा मछलीपट्टणम आणि कलिंगापट्टणम जवळ जास्त असणार आहेत. यामुळं आंध्र प्रदेशातील बहुतांश जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह अतीवृष्टी होण्याचा अंदाज आहे.श्रीनिवास राव पुढे म्हणाले की, 'आम्ही आंध्र प्रदेशातील तीन जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट दिला आहे.




पेड्डापल्ली, जयशंकर फुपालपल्ली आणि मुलुगू या जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. तर राज्यातील इतर पूर्वोत्तर जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आला आहे.

**महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांना फटका**

मोंथा वादळाचा सर्वाधिक प्रभाव हा आंध्र प्रदेशमध्ये पडणार असला तरी जेव्हा हे वादळ किनाऱ्यावरून पुढं सरकेल त्यानंतर इतर राज्यांवर देखील याचा परिणाम होईल असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. महाराष्ट्रातील विदर्भात या वादळाचा प्रभाव असेल असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. विदर्भातील पूर्व भागातील जिल्ह्यांना याचा विशेष फटका बसणार आहे. इथं पावसाच्या मध्यम सरी कोसळतील अन् सोसाट्याचा वारा देखील सुटेल असा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

अरबी समुद्रात देखील कमी दाबाचा पट्टा आधीच तयार झाला आहे. त्यामुळं महाराष्ट्रातील कोकण आणि घाटमाथा इथं सोसाट्याच्या वाऱ्यासह पाऊस पडतोय. त्यातच आचा मोंथा चक्रीवादळाचा देखील परिणाम महाराष्ट्रातील विदर्भावर होणार आहे. त्यामुळं पाऊस अजून काही दिवस तरी राज्यात मुक्काम ठोकून असणार आहे.

# सततच्या पावसाचा कांदा पिकावर परिणाम

## कृषी विज्ञान केंद्राकडून पीक सल्ला




दि.२८विदर्भ प्रजासत्ताक ४

सध्या सर्वदूर पाऊस हजेरी लावत आहेत. अशा परिस्थितीत अनेक शेती पिकांचे नुकसान होते आहे. नाशिक जिल्ह्यामध्ये काही भागामध्ये पाऊस पडत आहे. त्यामुळे कांदा पिकाला फटका बसला आहे. कांदा रोपवाटिकेमध्ये मर रोग येण्याची शक्यता आहे. या काळात काय काळजी घ्यावी, हे समजून घेऊयात.

जैविक बुरशीनाशक ट्रायकोडर्मा विरिडी शेणखतांमध्ये मिसळून रोपांमध्ये टाकावा.

त्यानंतर ४ ते ५ दिवसांनी कॉपर ऑक्सी क्लोराईड १ ग्रॅम/लिटर + त्यामध्ये कासूगामायसीन ०.५ ग्रॅम/लिटर प्रमाण घेऊन फवारणी करावी.तसेच कांदा लागवड केलेल्या पिकामध्ये मोठ्या प्रमाणात जांभळा करपा किंवा पीळ रोगाचे प्रमाण वाढण्याची शक्यता आहे.

तरी शेतकरी बांधवांनी पुढील प्रमाणे बुरशीनाशकाच्या आलटून पालटून फवारणी घ्याव्या. झेड -७८ १ ग्रॅम/लिटर किंवा टेब्यूकोण्याझोल १ मिली/लिटर किंवा बेनलेट १ ग्रॅम /लिटर व सोबत त्यामध्ये विद्राव्य खत १३:००:४५ ५० ग्रॅम/पंप प्रमाण घेऊन फवारणी करावी.

**- विशाल चौधरी, विषय विशेषज्ञ, पिक संरक्षण, कृषी विज्ञान केंद्र, मालेगाव.**

# भाजपा अमरावती शहर जिल्हात दिवाळी मिलन उत्साहात साजरा - डॉ. नितीन धांडे यांच्या नेतृत्वात भव्य आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २८ अमरावती**

भारतीय जनता पार्टी अमरावती शहर जिल्हा तर्फे शहर जिल्हाध्यक्ष डॉ. नितीन धांडे यांच्या नेतृत्वात दिवाळी मिलन कार्यक्रम मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात साजरा करण्यात आला. संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथील लॉनवर हा भव्य कार्यक्रम पार पडला.

प्रदेश भाजपाच्या सूचनेनुसार जिल्हा स्तरावर दिवाळी मिलनाचे आयोजन करण्यात येत असून, अमरावती शहर जिल्ह्यातील हा कार्यक्रम विशेष आकर्षण ठरला. या प्रसंगी माजी अध्यक्ष प्रवीण पोटे-पाटील, प्रदेश सचिव जयंत डेहनकर, प्रवक्ते शिवराय कुलकर्णी, किरण पातुरकर, रवींद्र खांडेकर, सरचिटणीस बादल कुलकर्णी, ललित समदुरकर, चेतन पवार, माजी पक्षनेता सुनील काळे, माजी स्थायी समिती सभापती सचिन रासने, ॲड. प्रशांत देशपांडे, ॲड. नवलानी आदी मान्यवर उपस्थित होते.

भारत मातेच्या पूजनाने व दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर भव्य फटाक्यांची आतषबाजी आणि संगीताचा मेळ घालून दिवाळी साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शहर जिल्हा सरचिटणीस बादल कुलकर्णी यांनी केले.



आपल्या शुभेच्छा संदेशात डॉ. नितीन धांडे यांनी सर्व कार्यकर्त्यांना नवीन ऊर्जेने काम करण्याचे आवाहन केले. त्यांनी सांगितले की, दिवाळीच्या शुभ पर्वावर आपण सर्वजण एकत्र आलो आहोत. या ऊर्जेतून आगामी काळात पक्षसंघटन अधिक बळकट करण्याचे ध्येय आपण ठेवूया.

संगीतमय कार्यक्रमात आर. के. मेलोडी आणि बी.के.डी. ग्रुप (संचालक श्री राम पछेल) यांच्या टीमने सुंदर ऑर्केस्ट्रा सादर केला. विशेष म्हणजे, अनेक भाजप पदाधिकाऱ्यांनी स्वतः गाणी गाऊन कार्यक्रमात रंग भरला. यात जयंत डेहनकर, शिवराय कुलकर्णी, बादल कुलकर्णी, सचिन रासने, सौ. सुधा तिवारी आदींचा सहभाग उल्लेखनीय ठरला. सौ. कल्याणी मुदलियार यांनी या संगीतमय कार्यक्रमाचे संचालन केले.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाथा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# गाव तिथे शाखा घर तिथे सैनिक ही काळाची गरज

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी अनेक संस्था, संघटना, पक्ष काढले. त्यातील बऱ्याचश्या संघटन, संस्था तथा पक्षाची त्यांनी नावे बदलली किंवा काही बंद सुद्धा केल्यात परंतु समता सैनिक दल स्थापनेपासून तर डॉ.बाबासाहेबांच्या निर्वाणा पर्यंत त्यांच्या प्रत्येक सामाजिक, धार्मिक आणि राजकीय आंदोलनात सोबत राहिले, सक्रीय राहिले आहे. आज देशाचे वातावरणात झपाट्याने बदलत असून सामान्य माणसाचे जीवन धोक्यात येईल की काय असे वातावरण असा प्रश्न उपस्थित होतो आहे. प्रतीक्रांतीने नवे रूप धरण केले असून अन्यायाच्या पद्धतीत नवे परिमाण स्थापित केले जात आहेत अशा वेळी समाज हितासाठी समता सैनिक दलाची गाव तिथे शाखा घर तिथे सैनिक ही काळाची गरज आहे असे प्रतिपादन समता सैनिक दलाचे महाराष्ट्र संघटक मार्शल अनिकेत उबाळे, यांनी केले. ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर संस्कार भवन (संबोधी) यशोदानगर, अमरावती येथे समता सैनिक दल अमरावती शाखा आयोजित पाच दिवसीय निवासी शिबिराच्या समारोपीय कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.यावेळी विचार मंचावर मार्शल डी.पी. रुपनारायण, कुंदाताई सोनुले, मार्शल प्रकाश दातार, मार्शल निवारण कांबळे, मार्शल अश्वजीत वानखडे, नवनियुक्त अमरावती जिल्हा संघटक मार्शल संजय मोखडे आदी मान्यवर उपस्थित होते.पुढे बोलतांना उबाळे म्हणाले की, समता सैनिक दला मुळेच या प्रत्येक आपण लढ्यात यशस्वी झालो. आताही वेगवेगळ्या संघटना न काढता डॉ. बाबासाहेबांनी निर्माण केलेल्या मातृ संघटनेला बळकटी द्यावी, त्यासाठी सैनिकांनी वेळेचे नियोजन करून संघटन वाढीसाठी वेळ काढणे आवश्यक आहे, असेही ते म्हणाले.नवनियुक्त जिल्हा संघटक मार्शल संजय मोखडे कार्यक्रमाचे प्रास्ताविकात म्हणाले की, मी एक सामान्य कार्यकर्ता म्हणून दलात सामील झालो. माझ्यासारख्या सामान्य सैनिकावर विश्वास ठेवून आज माझ्यावर दलाने अतिशय महत्वाची जबाबदारी दिली आहे. या जबादारीची जाणीव ठेवून मी एका वर्षाच्या आत दलाचे १००० सैनिक अमरावती जिल्ह्यात उभे करणार असा संकल्प याप्रसंगी त्यांनी जाहीर केला.दि. १८ ते २२ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या या पाच दिवसीय निवासी शिबिरात मैदानी प्रशिक्षण, पि.टी, परेड, लाठीकाठी आणि स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण मार्शल सम्यक घुले, मार्शल सुशील मेश्राम, मार्शल देवेंद्र दिहाडे, मार्शल मंगेश तायडे. मार्शल जय बागडे यांनी शिबिरार्थ्यांना दिले. तर बुद्ध जीवन प्रणाली, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, प्रियदर्शी सम्राट अशोक, माता रमाई, आंबेडकरी साहित्य तसेच व्यक्तिमत्त्व विकास आणि कार्यकर्ता कसा असावा, याबाबत विनय सोनुले, कुंदाताई सोनुले, संदीप राऊत, नारायण थोरात, दिलीप तायडे, राहुल वासेकर प्रा. संजय घरडे, निवारण कांबळे यांनी बौद्धिक प्रशिक्षण दिले. शिबिराचे उद्घाटन संबोधीच्या अध्यक्षा डॉ. पुष्पाताई थोरात यांनी केले,शिबिराची सांगता करण्यापूर्वी समता सैनिक दलाचे पथसंचलन परिसरातील संजयगांधी नगर पंचशील नगर, फ्रेझरपुरा, यशोदानगर शांती नगर या भागातून करण्यात आले या पथसंचालनाच्या वेळी परिसरातील नागरिकांनी सैनिकांचे जालोश्यात स्वागत केले.सांगता समारंभाचे सूत्रसंचालन मंगेश तायडे .यांनी केले तर निरंजन हेंडवे यांनी उपस्थितांचे आभार मानले. शिबिरात वेगवेगळ्या गावातील नवसैनिक मोठ्या संखेने सहभागी झालेत.शिबिराच्या आयोजनात अमरावती जिल्हा कार्यकारणीचे जिल्हा संघटक मार्शल संजय मोखडे,शुद्दोधन गडलिंग, निरंजन हेंडवे, साजन बन्सोड, जितू धुरंधर, आशिष हेंडवे, क्षितिज गडलिंग,संघपाल सरदार, अश्विन वाकोडे , निलेश रेखापुत्त, अजय तेलंग, अश्व्जीत वानखडे, मंगेश तायडे, देवेंद्र दिघाडे,जय बागडे यांनी परिश्रम घेतले. तर शिबिराच्या यशस्वितेकरिता , सुदाम सोनुलेराजेश गरुड, वर्षाताई गरुड,धर्मशील गेडाम,विलास थोरात, आर, एस तायडे, रक्षनाताई सरदार, गुणराज भगत, रतन थोरात . आदींनी मोलाचे सहकार्य केले. संबोधीच्या सहकार्यामुळेच हे शिबिर यशस्वीपणे पार पडले




# जिल्हाधिकारी कार्यालयात दक्षता जनजागृती सप्ताहानिमित्त भ्रष्टाचार निर्मूलन प्रतिज्ञा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती,**

जिल्हाधिकारी कार्यालयात आज दक्षता जनजागृती सप्ताहानिमित्त निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर यांनी अधिकारी, कर्मचारी यांना भ्रष्टाचार निर्मूलनाची प्रतिज्ञा दिली.यावेळी उपजिल्हाधिकारी विवेक जाधव, ज्ञानेश्वर घ्यार, जिल्हा पुरवठा अधिकारी निनाद लांडे, अधिक्षक निलेश खटके, विधी अधिकारी नरेंद्र बोहरा यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी – कर्मचारी उपस्थित होते. देशाच्या आर्थिक, सामाजिक तथा राजकीय प्रगतीमध्ये भ्रष्टाचार हा एक मोठा अडथळा असून सर्व कामे प्रामाणिकपणे करण्याची प्रतिज्ञा यावेळी उपस्थितांनी घेतली.

# कैकाडी महाराजांचा रस्ते अपघातात मृत्यू; भाविकांमध्ये शोककळा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८धामणगाव रेल्वे**

विदर्भातील लाखो श्रद्धाळूंच्या श्रद्धेचे केंद्र असलेले संत मनोज बाबा उर्फ मनोज उकंडरावर कैकाडी महाराज यांचे भीषण रस्ते अपघातात निधन झाले.



शनिवारच्या रात्री ते मोटारसायकलने आपल्या गावाकडे परतत असताना अचानक रस्त्यावर एक म्हैस आल्याने त्यांचे वाहन नियंत्रण सुटून घसरले. गंभीर जखमी अवस्थेत मनोज बाबा यांना तात्काळ पुलगाव येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

मनोज महाराज कैकाडी हे मुळचे जुना धामणगाव (शहापूर) येथील रहिवासी होते. ते ब्रह्मचारी जीवन जगत होते. यवतमाळ जिल्ह्यातील तळेगाव येथे त्यांचा आश्रम असून, तेथे दररोज हजारो भक्त दर्शनासाठी येत असतात. मागील चार दिवसांपासून ते शहापूर गावात वास्तव्यास होते.

रविवार सकाळी ते आपल्या एका मित्रासह आजनसरा दर्शनासाठी गेले होते. परतीच्या प्रवासात वर्धा जिल्ह्यातील पिंपरी गावाजवळ हा अपघात झाला.मनोज महाराज कैकाडी यांच्या निधनाने संपूर्ण विदर्भात शोककळा पसरली आहे. श्रद्धाळू त्यांना एक दयाळू, भक्तिभावाने ओतप्रोत संत म्हणून स्मरत आहेत. त्यांच्या मागे आई–वडील आणि विशाल भक्त परिवार शोकाकुल आहे.

# एका आठवड्यात सोयाबीन शासकीय खरेदी केंद्र सुरू करा अन्यथा तीव्र आंदोलन

## तालुका कॉंग्रेस कमिटी व शेतकऱ्यांचा सरकारला इशारा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८तिवसा**

तिवसा तालुक्यातील सोयाबीन व कापूस उत्पादक शेतकरी हवालदिल झालेला असून, सततच्या पावसामुळे अतिवृष्टी सदृश्य पर्जन्यमानामुळे सोयाबीनचे पीक त्याच्या हातून गेले असून अनेक शेतकऱ्यांना सोयाबीन सोंगावे सुद्धा लागले नाही.दिवाळी सण आटोपून एक आठवडा झालाअसून सुद्धा शासनाकडून कुठलीही मदत तालुक्यातील शेतकऱ्यांना झाली नसून सोयाबीन उत्पादक शेतकरी आर्थिक विवंचनेत आहे.

रब्बी हंगामासाठी शेतीचे नियोजन करावयाचे असून,जे काही पदरी पडलेले सोयाबीन आहे त्याला समाधानकारक भाव मिळत नसल्याने, व व्यापारी वर्ग शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणूक करत असून, शासनाने हमीभाव जाहीर केला त्याप्रमाणे सोयाबीन हमीभावाच्या तुलनेत अत्यल्प भावाने अडचणीचा फायदा घेऊन शेतकऱ्यांना त्याचे सोयाबीन नाइलाजाने विकावे लागत आहे.

शासकीय ( नाफेड ) सोयाबीन खरेदी केंद्र तिवसा येथे एका आठवड्यात सुरू करण्यात यावे अशी मागणी निवेदनाद्वारे तिवसा तालुका काँग्रेस व शेतकऱ्यांनी तहसीलदार तिवसा यांना केली. यामुळे शेतकऱ्यांना हमीभावाप्रमाणे रास्त भाव मिळाल्यास त्याला या शासकीय खरेदी केंद्राचा आधार होईल.एका आठवड्यात शासकीय खरेदी केंद्र सुरू न झाल्यास तालुका काँग्रेस कमिटी व शेतकरी प्रशासनाच्या व सरकारच्या विरोधात आंदोलन करणार असल्याचा इशारा यावेळी देण्यात आला.

यावेळी तालुका काँग्रेस कमिटी अध्यक्ष वैभव वानखडे, खरेदी–विक्री संघाचे अध्यक्ष सुरेश मेटकर, कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती रवी राऊत, मोहनराव वानखडे, विवेक देशमुख, शहराध्यक्ष सेतू देशमुख, कार्याध्यक्ष सुनील बाखडे, गजानन अळसपुरे, रवींद्र हांडे, रामराव तांबेकर, लुकेश केने, सचिन सोटे, नगरसेवक योगेश वानखडे, संदीप मंगेश भगोले, प्रदीप दमाये, विश्वजित बाखडे, प्रमोद वानखडे, गजानन भोंबे, प्रशांत कांबळे, संदीप आमले, नरेंद्र विघ्ने, हरिदास भगत, आशिष बायस्कर, भारत ढोणे, सुधीर बोके, राजू वेरूळकर, छत्रपती डोंगरे, सुरज धूमनखेडे, प्रणव गौरखेडे, अतुल खुळे, अमोल पन्नासे, सागर राऊत, अनिकेत तालन,अक्षय पवार, संजय इंगळे, वैभव ढवळे,दीपक वानखडे, सुनिल कुऱ्हाडे, रणजित सपाटे, अमोल बंगरे शेहजाद पटेल, मोतीभाऊ पवार, अरुण मोहोड, जानराव मारोटकर,अनंत शेंद्रे आदी पदाधिकारी व शेतकरी उपस्थित होते

# दर्यापूरमध्ये देशी कट्टा, मॅगझीनसह एक जण अटक

## आरोपीकडून चाकूही जप्त ग्रामीण गुन्हे शाखेची कारवाई



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८ अमरावती**

ग्रामीण गुन्हे शाखेच्या पथकाने दर्यापूर शहरात एका आरोपीला देशी कट्टा, मॅगझीन आणि चाकूसह अटक केली आहे. आरोपी गुन्ह्याची योजना आखण्यासाठी हत्यारांसह फिरत असल्याची माहिती मिळाली होती.

अटक केलेल्या आरोपीचे नाव अंकित किशोर घाटे (वय २९, जुनी तहसील जवळ, दर्यापूर) असे आहे. मिळालेल्या माहितीनुसार, २५ ऑक्टोबर २०२५ रोजी ग्रामीण गुन्हे शाखेचे पथक दर्यापूर पोलिस ठाण्याच्या हद्दीत गस्त घालत होते. त्या दरम्यान गुप्त माहिती मिळाली की, दर्यापूर–अंजनगाव मार्गावरील महावितरण कार्यालयाजवळील एमआयडीसी रोडवर एक व्यक्ती घातक गुन्हा करण्याच्या उद्देशाने हत्यारांसह उभा आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पोलिसांनी तातडीने त्या ठिकाणी जाऊन घेराबंदी करून संशयिताला ताब्यात घेतले. त्याची झडती घेतल्यावर त्याच्याकडून १० हजार रुपये किंमतीचा देशी कट्टा, एक मॅगझीन आणि २०० रुपयांचा चाकू जप्त करण्यात आला.या प्रकरणी दर्यापूर पोलिस ठाण्यात आरोपीविरुद्ध आर्म्स क्ट अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला असून, पोलिस आरोपीकडून हत्यारांचा उद्देश आणि त्यामागील गुन्हेगारी हेतूची चौकशी करत आहेत.

# बिबट मादीला पकडण्यासाठी वरूण नगरमधील मंदिराजवळ लावला पिंजरा

## दुसऱ्या दिवशीही पिलांसह दिसली मादी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८ अमरावती**




वडाळी वनपरिक्षेत्रातून शिकाराच्या शोधात शहराच्या दिशेने आलेली मादी तेंदूआ व तिची दोन पिल्ले सध्या महादेवखोरी परिसरातील वरूण नगरात मुक्कामाला आहेत. शनिवारी संध्याकाळी ७.३० वाजता आणि रात्री १.५७ वाजता महादेवखोरी परिसरात शिकाराच्या शोधात फिरताना मादी तेंदूआ व तिची दोन पिल्ले दिसली होती. त्यानंतर रविवारच्या मध्यरात्री २ वाजता ती पुन्हा वरूण नगर परिसरात दिसल्याची माहिती समोर आली आहे.

परिसरात निर्माण झालेल्या भीतीच्या वातावरणामुळे, वनविभागाने तातडीने तेंदूया पकडण्यासाठी वरूण नगर परिसरात पिंजरा लावला आहे.

सोमवारी सकाळी वडाळी वनविभागाला वरूण नगर परिसरातील नागरिकांकडून तक्रार प्राप्त झाली की, रविवारच्या रात्री पुन्हा एकदा मादी तेंदूया व तिची दोन पिल्ले परिसरात फिरताना दिसली. रात्री उशिरा परिसरात कुत्र्यांच्या भुंकण्याचा आवाज वाढल्याने लोकांनी बाहेर पाहिले असता तेंदूया व तिची पिल्ले दिसल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे परिसरातील नागरिकांनी तेंदूयांचा बंदोबस्त करण्याची मागणी केली.या तक्रारीनंतर सोमवारी मंदिराजवळ पिंजरा लावण्यात आला, अशी माहिती वनपरिक्षेत्र अधिकारी प्रदीप भड यांनी दिली.लोकांमध्ये पसरलेल्या भीतीच्या पार्श्वभूमीवर वरूण नगर परिसरातील मंदिराजवळ पिंजरा बसवण्यात आला असून, रात्रीच्या वेळी वनविभागाने गस्त वाढवली आहे, असे त्यांनी सांगितले.

# सोलापूर पोलिसांनी दिला होता अलर्ट, तरीही बडनेरा जीआरपीने दाखवली निष्काळजीपणा

## शहर गुन्हे शाखेनेही चोरांच्या फोटोची माहिती दिली होती – दरवर्षी दिवाळीपूर्वी विदर्भात सक्रिय होते तेच कुख्यात टोळके

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८बडनेरा**

बडनेरा रेल्वे स्थानकावर दिवाळीच्या एक दिवस आधी रेल्वेच्या जनरल डब्यातून जळगावच्या व्यापारी किशोर शर्मा यांच्याकडून २.११ कोटी रुपयांचे सोनं चोरीला जाण्याच्या प्रकरणात नवी माहिती समोर आली आहे.

चौकशीत उघड झाले आहे की, सोलापूर पोलिसांनी या कुख्यात चोरीच्या टोळीबाबत आधीच विदर्भातील सर्व जिल्ह्यांना अलर्ट जारी केला होता, मात्र बडनेरा जीआरपीने त्याकडे विशेष लक्ष दिले नाही. परिणामी ही मोठी घटना घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, सोलापूर पोलिसांनी गत आठवड्यातच एका टोळीच्या हालचालीबाबत सर्व जिल्ह्यांच्या पोलिसांना माहिती पाठवली होती. शहर गुन्हे शाखेचे पीआय संदीप चव्हाण यांनीही जीआरपी आणि इतर पोलिस अधिकाऱ्यांना टोळीच्या सदस्यांचे फोटो, हालचाली आणि जुन्या गुन्ह्यांची माहिती शेअर केली होती. हे फोटो पोलिसांच्या अनेक व्हॉट्सॲप ग्रुपवर व्हायरल झाले होते.

तरीसुद्धा बडनेरा जीआरपीने कोणतीही ठोस कारवाई केली नाही, आणि या निष्काळजीपणाचा परिणाम म्हणून व्यापाऱ्याला कोट्यवधींचे नुकसान सोसावे लागले.

सध्या बडनेरा जीआरपी चोरांच्या गावापर्यंत पोहोचली आहे, मात्र आरोपी अजूनही फरार आहेत. पोलिसांच्या अनेक पथकांकडून सतत सर्च ऑपरेशन सुरू आहे.सूत्रांच्या माहितीनुसार, चोरांकडे अजूनही चोरी केलेले सोनं आहे, आणि काळ जसजसा पुढे जात आहे, ते पोलिसांच्या आवाक्याबाहेर जात आहेत.

गेल्या अनेक वर्षांपासून सोलापूरमधील हीच चोरांची टोळी विदर्भात दिवाळीच्या आधीच्या आठवड्यात सक्रिय होते. ही टोळी प्रामुख्याने रेल्वे स्टेशन, बसस्थानक आणि ज्वेलरी मार्केट परिसरात चोरीच्या घटना घडवते, आणि दरवर्षी वेगवेगळ्या जिल्ह्यांमध्ये वारदात करून गायब होते.

# पत्नीने नवऱ्याच्या प्रेयसीला ऑटोतून ओढून केली मारहाण

## इर्विन चौकात गोंधळ, वाहतूक कोंडी – मुलीच्या वयाच्या तरुणीशी होता प्रेमसंबंध

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

इर्विन चौकात सोमवारी रात्री एक नाट्यमय प्रकार घडला. एका पत्नीने आपल्या मुलीसह नवऱ्याच्या प्रेयसीला ऑटोतून खाली ओढून चौकातच सर्वांसमोर चोप दिला. या घटनेमुळे काही वेळ वाहतुकीचा खोळंबा झाला आणि परिसरात मोठी गर्दी जमली. ही घटना रात्री सुमारे ८ वाजताच्या सुमारास घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित महिला व तिचा नवरा फ्रेझरपुरा पोलिस ठाण्याच्या हद्दीत राहतात. नवरा ऑटो चालक असून, गेल्या काही दिवसांपासून तो त्याच भागात राहणाऱ्या २३ वर्षीय तरुणीच्या संपर्कात आला होता. दोघांचे संबंध 'फिल्मी स्टाइल'मध्ये सुरू झाले आणि त्यांची चर्चा संपूर्ण परिसरात पसरली होती. पत्नीला याची कल्पना आल्यानंतर तिने नवऱ्याला जाब विचारला. मात्र नवऱ्याने स्पष्टीकरण देत सांगितले की, ती तरुणी माझ्या ऑटोतून कामावर जाते आणि परत येते, एवढंच आहे.

काही दिवसांपूर्वी पत्नीने नवऱ्याला त्या तरुणीसोबत रस्त्याच्या कडेला उभ्या ऑटोत बोलताना पाहिले, त्यानंतर ती संतापली. तिने दोघांना पकडून फ्रेझरपुरा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. पोलिसांनी हा प्रकार घरगुती वाद मानून समजुतीने सोडवून दिला, पण ऑटोचालक नवऱ्याने आपली वागणूक सुधारली नाही. सोमवारी रात्री तो पुन्हा त्याच तरुणीसह ऑटोत दिसला. हे पाहताच संतप्त पत्नीने मुलीसह ऑटो थांबवला, प्रेयसीला खाली ओढून सर्वांसमोर मारहाण केली. घटनेचे दृश्य पाहण्यासाठी लोकांची गर्दी झाली आणि काही काळ वाहतूक ठप्प झाली. घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली असून, फ्रेझरपुरा पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

# बायको माहेरी पती ढाब्यावरी...

## दिवाळी सुट्यांत मंडळी गावी गेल्याने हॉटेलवर पतिराजांच्या ओल्या पार्ट्या – मांसविक्रीत्याना आले तीन दिवसांपासून सुगीचे दिवस

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८ अंजनगाव सुर्जी**

दिवाळी सुट्यांमुळे बायको माहेरी गेल्याने असंख्य पतिराज ढाबे, बारमध्ये खरी दिवाळीं साजरी करीत आहेत. बायको गावी गेल्यामुळे आपल्या मित्र परिवाराबरोबर त्यांची ओल्या पाट्यांची धूम सध्या सुरू आहे, अंजनगाव शहरातील ढाबे व बार, दर्यापूर रोड अकोट रोड तसेच परतवाडा रोडसह शहरालगत असलेल्या सर्वच प्रमुख रस्त्यांवरील हॉटेल आणि ढाब्यांवर तमाम पतिराजांची गर्दी उसळली आहे. त्यात शासकीय सेवेतील कर्मचारी-अधिकारी, शिक्षक संख्या सर्वाधिक आहे.दिवाळीच्या सुट्यांमध्ये कपन्यांसह ईतर क्षेत्रातील आस्थापनांना सुट्या असल्याने महिला मुलांसह दिवाळीसाठी आपापल्या माहेरी गेल्या आहेत, वर्षातून येंणाऱ्या या सुवर्णसंधीचा फायदा घेऊन पुरुष मंडळी आपल्या मित्र परिवार, तसेच नातेवाईका बरोबर सध्याच्या गुलाबी वातावरणात चमचमीत खाण्यासाठी शहरालगतच्या विविध मार्गावरील हॉटेलमध्ये डेरेदाखल आहेत. अंजनगाव अकोट रस्त्यावर तर मोठी गर्दी



पाहायला मिळत आहे. तेथील ढाबे, हॉटेल, तसेच रेस्टहाउसवर दिवसभर ओल्या पार्ट्या सुरू आहेत.निवडणूक प्रचारात सक्रिय झालेले आणि नेत्यांपासून पैसे उकळणारे हुशार कार्यकते आता दारू, मटण, माशांवर मित्रांसोबत खिसा खाली करत आहेत.नगरपरिषद पंचायत समिती व जिल्हा परिषद ला उभे राहणारे उमेदवार घरात बसून निराशेने एकेक क्षण कसा चालवयाचा या विचारात बुडालेले असताना हुशारआणि हिशोबी कार्यकर्ते उमेदवारानं प्रचारासाठी दिलेल्या पैशावर ताव मारत आहेत,

गेल्या वर्षाच्या तुलनेत यंदा धाबेवाल्यांची दिवाळी जोरात सुरू असून रात्री बारा-बारा पर्यंत ऑर्डर पूण करताना त्यांची पाठ मोडायची बाकी राहिली आहे, कारण शनिवार- रविवारपर्यत शासकीय सुट्टी आल्यामुळे गर्दी वाढत आहे. असे अंजनगाव सुर्जी दर्यापूर-रोडवरील एका धाबे मालकाने बोलताना सांगितले

दिवाळी मुळे अनेक दिवसांपासून मांसाहार खाणे बंद होते त्यामुळे मांसाहार खाणाऱ्याची तीन दिवसांपासून गर्दी उसळली आहे त्यामुळे मांसाहार विक्री करणाऱ्यांची तीन दिवसांपासून चांगलीच व्यवसायात यशस्वी होत असल्याने मांस विक्रीत्यांना चांगलेच सुगीचे दिवस आले आहे अशी माहिती मटन विक्री त्याकडून समजली आहे

# 'साथी पोर्टल-२' च्या सक्तीविरोधात राज्यभर कृषी निविष्ठा विक्रेत्यांचा एकदिवसीय बंद

## अमरावतीतही विक्रेत्यांचा उत्स्फूर्त सहभाग, रक्तदान शिबिरातून सामाजिक बांधिलकीचा परिचय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

राज्य शासनाच्या कृषी विभागाने 'साथी पोर्टल – २' चा वापर सर्व कृषी निविष्ठा विक्रेत्यांसाठी सक्तीचा केला आहे. मात्र या पोर्टलला विरोध दर्शविण्यासाठी आणि आपल्या मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी महाराष्ट्र फर्टिलायझर, पेस्टिसाईड्स अँड सिड्स डीलर्स असोसिएशनच्या आवाहनानुसार राज्यभरातील कृषी निविष्ठा विक्री केंद्रांनी मंगळवार, २८ ऑक्टोबर रोजी खरेदी-विक्री बंद ठेवत राज्यव्यापी बंदचे आयोजन केले.या बंदचा परिणाम अमरावती शहर आणि जिल्ह्यातही स्पष्टपणे जाणवला. येथील सर्व कृषी साहित्य विक्रेत्यांनी आपापली प्रतिष्ठाने बंद ठेवत शांततेत आंदोलनात सहभाग घेतला. विक्रेत्यांनी आपल्या केंद्रांवर साथी पोर्टल




– २ अंमलबजावणीविरोधात विक्रेत्यांचा निषेध असे फलक लावून शासनाविरोधातील नाराजी व्यक्त केली.विक्रेत्यांच्या म्हणण्यानुसार, साथी पोर्टल – २ द्वारे बियाणे आणि कीटकनाशकांची विक्री प्रत्यक्षात शक्य नाही, तसेच या प्रणालीमुळे कृषी केंद्रांना अनावश्यक नियम, त्रासदायक कारवाई आणि तांत्रिक अडचणींना सामोरे जावे लागते. यापूर्वी कृषी विभागाने विक्रेत्यांच्या तक्रारींचा विचार करून अंमलबजावणी स्थगित करण्याचे आश्वासन दिले होते; मात्र प्रत्यक्षात पोर्टलचा सक्तीने वापर सुरू असल्याने विक्रेत्यांमध्ये तीव्र असंतोष आहे.

या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्व जिल्हा संघटनांनी एकमुखी ठराव करून या सक्तीविरोधात आंदोलन करण्याचा निर्णय घेतला. अमरावतीत जिल्हा व तालुका स्तरावरील पदाधिकाऱ्यांनी विक्रेत्यांना मार्गदर्शन करत अभी नहीं तो कभी नहीं अशी भूमिका स्पष्ट केली आणि आपली एकजूट अधिक बळकट करण्याचे आवाहन केले.

राज्यव्यापी बंदच्या निमित्ताने अमरावती जिल्हा कृषी साहित्य विक्रेता सेवा संघाच्या वतीने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. रक्तदान म्हणजेच सर्वश्रेष्ठ दान या घोषवाक्याला अनुसरून सर्व सदस्य व पदाधिकाऱ्यांनी स्वेच्छा रक्तदान करून सामाजिक बांधिलकीचा परिचय दिला. रक्तदात्यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.या प्रसंगी संघाचे अध्यक्ष मिलिंद विलासराव इंगोले, सचिव संजय उंबरकर, उपाध्यक्ष राजेश अग्रवाल व अभिषेक कडू, कोषाध्यक्ष विरेंद्र शर्मा, सर्व सदस्य तसेच अमरावती जिल्हा रक्तदान समिती व डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय रक्तपेढीचे प्रतिनिधी उपस्थित होते.अध्यक्ष मिलिंद इंगोले यांनी सांगितले की, साथी पोर्टलमार्फत विक्री व्यवहार करणे व्यवहार्य नाही. त्यामुळे कृषी निविष्ठा विक्रेत्यांवरील अन्यायकारक व जाचक अटींविरोधात हा आमचा राज्यव्यापी बंद आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

# आ. रवी राणा यांच्या प्रयत्नांना यश – अमरावतीत ई-बस डेपो व चार्जिंग स्टेशनसाठी शासनाची मंजुरी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

केंद्र शासन पुरस्कृत पी.एम. ई-बस योजनेंतर्गत अमरावतीत ई-बस डेपो व चार्जिंग स्टेशन उभारणीसाठी शासनाने मंजुरी दिली आहे. मौजा बडनेरा येथील सर्व्हे क्र. ११० मधील २.३८ हे.आर. शासकीय जमीन अमरावती महानगरपालिकेला ३० वर्षांच्या कालावधीसाठी विनामूल्य भाडेपट्याने देण्याबाबत महसूल व वन विभाग मंत्रालयाने आज शासन निर्णय जारी केला.

या निर्णयासाठी आमदार रवी राणा यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री यांच्या कडे सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या प्रयत्नांना अखेर यश आले असून शहराच्या सार्वजनिक वाहतुकीच्या दृष्टीने हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा



ठरणार आहे.

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ चे कलम ३८ व ४० तसेच महाराष्ट्र जमीन महसूल (शासकीय जमिनीची वाटप व भाडेपट्टा) नियम १९७१ मधील नियम ५ व ३५ नुसार, शासनाने प्रचलित अटी व शर्तींच्या अधीन राहून मंजुरी दिली आहे.

या निर्णयामुळे अमरावती व बडनेरा शहरात स्वच्छ, पर्यावरणपूरक आणि आधुनिक वाहतूक प्रणालीची दिशा निश्चित झाली आहे. स्थानिक नागरिक, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी आमदार रवी राणा यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले असून शासकीय अधिकारी व प्रशासनातही समाधान व्यक्त केले जात आहे.

# शिक्षण, सामाजिक समानता , आर्थिक विकास क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करा

## आ .प्रताप अडसड यांचे आवाहन क्षत्रिय मराठा कलार समाजाचे महासंमेलन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८धामणगाव रेल्वे**

समाजातील शेवटच्या घटकातील व्यक्तीची प्रगती होण्यासाठी समाज बांधवांनी शिक्षण, सामाजिक समानता आणि आर्थिक विकास यांसारख्या क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करावे असे आवाहन आ प्रताप अडसड यांनी केलेयेथील माहेश्वरी भवन येथेक्षत्रिय मराठा कलार समाजाचे महासंमेलन व युवक -युवती परिचय मेळावा घेण्यात आला यावेळी अध्यक्षस्थानी भगवान डोहळे,प्रमुख अतिथी नामदेव जमईवार,राजेश चवरे,पालकचंद सेवईवार, दिलीप सुर्यवंशी,नरेंद्र धुवारे यांची उपस्थिती होतीमेळाव्यात तीनशे युवक - युवतीने आपला परिचर दिला जिल्हा मजूर संघाच्या अध्यक्षपदी समाजाचे माधव शेंडे यांची नियुक्ती झाल्यामुळे त्यांचा तसेच समाजातील प्रतिभावंताचा गौरव आ प्रताप अडसड यांच्या हस्ते करण्यात आला. गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह देऊन कौतुक करण्यात आले कार्यक्रमाला विदर्भातील मान्यवरानी हजेरी लावली होती संयोजक विनोद धूवे व माधव शेंडे यांनी उपस्थितांचे आभार मानले

**कलार समाजाचे पहिले कावलीत होणार भवन**

विदर्भातील संपूर्ण कलार समाज हा भाजपच्या पाठीशी नेहमी उभा राहिला आहे नगरसेवक ते वरिष्ठ पदापर्यंत भाजपातून कार्यकर्ते घडले आहे या समाजाचे मतदार संघात पहिले समाज भवन कावली येथे होणार असल्याचे आ प्रताप अडसड यांनी घोषित केले. समाज बांधवांनी त्यांचे आभार मानले.

# 'भगवान बिरसा कला संगम'ची विभागीय स्पर्धा संपन्न

## आदिवासी कलावंतांना राज्यस्तरीय ओळख देणाऱ्या स्पर्धेचे भव्य आयोजन




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

आदिवासी एकता मित्र मंडळ, स्व. लक्ष्मणराव मांनकर ट्रस्ट आणि प्रगती प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने भगवान बिरसा मुंडा यांच्या १५०व्या जयंती वर्षानिमित्त 'भगवान बिरसा कला संगम' ही राज्यस्तरीय आदिवासी कला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती

या स्पर्धेची पश्चिम विदर्भ विभागीय फेरी (डिव्हिजनल राउंड) मंगळवार, २८ ऑक्टोबर रोजी अमरावती येथे पार पडले. आहे. ही स्पर्धा सकाळी १० वाजता क्षितिज पॅलेस, राजपूत ढाबा जवळ, नवसारी चौक, अमरावती येथे झाली. या फेरीत पश्चिम विदर्भातील अकोला, अमरावती, बुलढाणा, थरीहळा (वाशीम) आणि यवतमाळ या जिल्ह्यांतील सुमारे ४०० स्पर्धक सहभागी झाले होते.

महाराष्ट्रातील आदिवासी कलाकारांना संधी, सन्मान आणि राज्यस्तरीय ओळख मिळवून देण्याच्या उद्देशाने या स्पर्धेत नृत्य, गायन, वाद्यवादन, चित्रकला, हस्तकला, रील्स, व्लॉग्स, फोटोग्राफी, डॉक्युमेंटरी आणि शॉर्ट फिल्म अशा विविध कला प्रकारांमध्ये स्पर्धा घेतल्या गेल्यात.

पूर्व विदर्भ क्षेत्रातील फेरी गडचिरोली येथे आयोजित केली जाणार असून, राज्यस्तरीय अंतिम फेरीचे आयोजन येत्या महिन्यात नागपूर येथे केले जाईल.महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागाच्या वतीने आयोजित या अंतिम फेरीतील विजेत्यांना आकर्षक व सन्माननीय पारितोषिके प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती स्व. लक्ष्मणराव मानकर ट्रस्टचे सचिव प्रशांत बोपर्डीकर यांनी दिली.

# साखरी येथे माकडाचा हल्ला १३ वर्षीय मुलगी गंभीर जखमी



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८अंजनगाव सुर्जी**

अंजनगाव सुर्जी तालुक्यातील साखरी गावात दिवस २७ ऑकक्टोबंर रोजी सकाळी माकडाने १३ वर्षीय मुलीला चावा घेऊन गंभीर जखमी केले आहे.या घडलेल्या घटनेने साखरी गाव भयभीत झाले आहे. साखरी येथील वैष्णवी प्रकाश पवार (वय १३ वर्षे) या मुलीवर माकडाने हल्ला करून गंभीर जखमी केले आहे.मिळालेल्या माहितीनुसार, वैष्णवी शेतशिवारात खेळत असताना अचानक माकडाने तिच्यावर झडप घातली व तिच्या पायाला जबर चावा घेतला. या अचानक झालेल्या हल्ल्याने मुलगी बेशुद्ध पडली होती. गावातील नागरिकांनी तात्काळ वैष्णवीला अंजनगाव सुर्जी ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र प्रकृती गंभीर असल्याने तिला पुढील उपचारांसाठी अमरावती येथील इर्विन जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले आहे.या घटनेमुळे साखरी गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, परिसरात माकडांचा वावर वाढल्याने नागरिकांमध्ये चिंता पसरली आहे.गावकऱ्यांनी वनविभागाकडे तीव्र संताप व्यक्त करत वन प्राण्यांच्या हौदोसाला आळा घाला व जखमी मुलीला तात्काळ आर्थिक मदत द्या अशी मागणी केली आहे.वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीचा आढावा घ्यावा व भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी आवश्यक ती पावले उचलावीत, अशी अपेक्षा साखरी वासीयांनी केली आहे.

# सेंद्रिय नावाखाली भलत्याच मालाची खपवाखपवी आता चालणार नाही

## केंद्र शासनाची समिती करणार प्रमाणपत्रांची तपासणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

देशात व राज्यात सेंद्रिय आणि नैसर्गिक शेती वाढत असताना सेंद्रिय नावाखाली असेंद्रिय उत्पादनांची विक्री वाढली आहे. यामुळे खऱ्या सेंद्रिय शेतकऱ्यांसह ग्राहकांचीही फसवणूक होत आहे. या गैरप्रकारावर आळा घालण्यासाठी केंद्र शासनाने प्रमाणित संस्थांकडून दिल्या जाणाऱ्या सेंद्रिय प्रमाणपत्रांची कसून तपासणी करण्याचे आदेश राज्य शासनाने दिले आहेत. त्यानुसार कृषी विभाग आता कामाला लागला आहे.बाजारात 'ऑर्गेनिक किंवा नैसर्गिक' अशा टॅगखाली अनेक उत्पादने विकली जातात, परंतु ती प्रत्यक्षात उत्पादने असेंद्रिय असतात.ग्राहकांनी लेबलवरील केंद्र प्रमाणित संस्थेचा लोगो आणि प्रमाणपत्र क्रमांक तपासणे आवश्यक आहे. यावरून सत्यता पडताळू शकता.केंद्र शासनाच्या मान्यताप्राप्त संस्था शेतकऱ्यांना सेंद्रिय शेतीचे प्रमाणपत्र देतात. मात्र, काही ठिकाणी खोट्या प्रमाणपत्रांचा वापर होत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे आता प्रत्येक प्रमाणपत्र समितीमार्फत तपासले जाणार आहे.सेंद्रिय उत्पादनांचे दर साधारण उत्पादनांपेक्षा जास्त असल्याने व्यापाऱ्यांकडून या नावाखाली नफा मिळवण्यासाठी ग्राहकांची फसवणूक केली जात आहे. चुकीचे उत्पादन खरेदी केल्याने संबंधित कुटुंबाचे आरोग्यसुध्दा धोक्याची येण्याची शक्यता असते, त्यामुळे शासन जागृत झाले आहे.

**सेंद्रिय व नैसर्गिक शेतकऱ्यांचीही फसवणूक**

सेंद्रिय शेती करणाऱ्या शेतकऱ्यांची खऱ्या अर्थाने बाजारात खोटी सेंद्रिय उत्पादने आल्याने प्रतिष्ठा घालवली जाते. त्यामुळे त्यांचा माल विकला जात नाही आणि त्यांना मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होते.

**एकाच प्रमाणपत्रावर अनेक जण विकतात असेंद्रिय माल**

अनेक ठिकाणी एकाच प्रमाणपत्राची छायांकित प्रती वापरून बाजारात असेंद्रिय माल सेंद्रिय म्हणून विकला जातो. या प्रकारांवर लक्ष ठेवण्यासाठी कृषी विभागाने विशेष पथक नेमले आहे.

# काय सांगता, ४० शासकीय ॲप्सचा ताण; मोबाइलसह शिक्षकही 'हँग'

## शिक्षकांवर ऑनलाइन कामांचा बोजा; दैनंदिन अध्यापनासह गुणवत्तेवर परिणामाची शक्यता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

राज्यातील प्राथमिक शिक्षकांना सध्या तब्बल ४० हून अधिक शासकीय मोबाइल ॲप्स, डिजिटल अहवाल प्रणाली आणि व्हॉट्सॲपवरील आदेशांच्या चक्रात अडकावे लागत आहे. या प्रचंड तांत्रिक आणि प्रशासकीय कामाच्या बोजामुळे शिक्षकांच्या मूळ अध्यापन कार्यावर गंभीर परिणाम होत असून, विद्यार्थ्यांचा शिक्षणाचा हक्क (कलम २१ अ) धोक्यात आला आहे.

शिक्षकांवरील हा डिजिटल ताण कमी करून तातडीने 'शिक्षक-मैत्रिपूर्ण एकीकृत डिजिटल प्रणाली' (युनिफाईड एज्युकेशन ॲप) तयार करण्याची मागणी विविध शिक्षक संघटनांनी निवेदनाद्वारे शासनाकडे करण्यात आली आहे.

**अध्यापनाला किती वेळ ?**

शिक्षकांना अध्यापनासाठीचा बहुमूल्य वेळ अत्यल्प उरतो. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० आणि शिक्षणाच्या अधिकाराच्या मूळ उद्देशांशी ही परिस्थिती पूर्णपणे विसंगत



असल्याचे शिक्षक संघटनांचे म्हणणे आहे.

**नुसत्या हजेरीसाठी वापरावे लागतात तीन-चार ॲप्स**

शाळांमध्ये पूर्वी शिक्षक विद्यार्थ्यांची दैनंदिन हजेरी रजिस्टरवर नोंदवित होते. शिक्षकांचीही दररोजची हजेरी रजिस्टरवर नोंदविली जात होती. मात्र, आता शासनाच्या नव्या निर्णयानुसार दैनंदिन हजेरी ऑनलाइन नोंदविली जात आहे. नुसत्या हजेरीसाठी तीन-चार ॲप्स कार्यान्वित करण्यात आल्या आहेत.

**मेल, व्हॉट्सॲपवर येतो रोज नवीन आदेश**

विविध व्हॉट्सॲप गटांवरून २४ तास आदेश, लिंक आणि नवीन माहितीची सक्ती केली जाते. शिक्षकांच्या मेल, व्हॉट्सॲपवर दररोज वरिष्ठांकडून तसेच शासनाकडून नवीन आदेश प्राप्त होतो. त्यामुळे शिक्षकांमध्ये गोंधळाचे वातावरण निर्माण झाले आहे.

**रोज वापरावी लागतात तब्बल ४० शासकीय ॲप्स**

शिक्षकांना सरल, शालार्थ, यू-डायस प्लस, माध्यान्ह भोजन, दीक्षा, प्रेरणा, परख अशा सुमारे ४० विविध ॲप्सवर दररोज हजेरी, विद्यार्थ्यांचे अहवाल, सर्वेक्षण, प्रशिक्षण आणि प्रशासकीय माहिती भरणे अनिवार्य आहे. या सततच्या ऑनलाइन कामांमुळे शिक्षकांचे मोबाइल 'हँग' होत आहेत.


आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत